# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in



**प्रेसनोट क्रमांक :- १६०-२२** **दिनांक - ०५/०६/२०२२**


## डायल ११२ या क्रमांकावर आलेल्या माहितीनुसार उत्तरप्रदेश मधील खुनाचे गुन्हयातील आरोपीतास अटक करण्यात वालीव पोलीस ठाण्यास यश

दिनांक ०५/०६/२०२२ रोजी सकाळी ०८.२० वाजता नियंत्रण कक्षातील डायल ११२ या क्रमांकावर एका इसमाने मोबाईल वरुन फोन करुन माहिती दिली की, “ त्याचे मेहुण्याने गावामध्ये एका इसमाचा मर्डर केला असुन तो सातिवली येथे येणार आहे. ” नमुद प्राप्त माहितीच्या आधारे वालीव पोलीस ठाणे येथीले पो.शि/राजेंद्र काकडे यांनी तात्काळ वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे कर्मचारी याचेशी संपर्क साधला. त्यानंतर कॉलरने दिलेल्या माहितीची खात्री करणे करीता बिट मार्शल व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे कर्मचारी हे तात्काळ सातिवली वसई पुर्व येथे गेले. त्यांनी कॉलरचे मदतीने सातिवली, आदर्श नगर, भवानी मेडीकल येथे सापळा रचुन एका इसमास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचा नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव नसीर सफाते, वय-३१ वर्षे, रा. ग्राम तिलीया, पोस्ट-कोटखास, थाना-खोडारे, जिल्हा-गौंडा, राज्य-उत्तरप्रदेश असे असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर इसमास अधिक चौकशी करीता पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

मिळालेल्या माहितीची खात्री करणे करीता वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी सदर आरोपीत याचेकडे कौशल्यापुर्ण चौकशी करुन त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे विचारपुस केली असता त्याने जि. बस्ती, राज्य-उत्तरप्रदेश येथे त्याची प्रेमीका काचंन नंदलाल गुप्ता हीचेशी असलेल्या विवाहबाहय संबंधातुन दोघांनी मिळुन कांचन गुप्ता हीचा पती नामे नंदलाल लवटु गुप्ता वय-३१ वर्षे रा. मु.पो. परसाखुर्द बुजुर्ग, दर्यापुर जंगल, टोला-तुलसीपुर, थाना-सोनहा, जि. बस्ती, राज्य-उत्तरप्रदेश याचा दिनांक-२५/०५/२०२२ रोजी रात्रीच्या दरम्यान धारधार शस्त्राने गळा कापुन खुन करुन मृतदेहाची विल्हेवाट लावणे कामी मृतदेह एका गोणीमध्ये भरुन त्याचेकडील असलेल्या प्लॅटीना मोटार सायकलला बांधुन आरोपीत राहत असलेल्या ठिकाणी तिलीया या गावी एका कोरडया विहरीमध्ये मृतदेह फेकुन विल्हेवाट लावल्याची कबुली दिली.

सदरची माहिती वरिष्ठांना देवुन वरिष्ठांचे सुचनेप्रमाणे सदर घटनेची खात्री करणेकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. कैलास बर्वे यांनी श्री. राजेश मोदक, पोलीस अधिक्षक बस्ती यांचेशी सपंर्क साधुन सदर घटनेची माहिती घेतली असता त्यांनी सोनहा पोलीस ठाणे गु.र.नं १०२/२०२२ भा.द.वि.स कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे जिल्हा बस्ती येथे गुन्हा दाखल असुन गुन्हा दाखल झाले पासुन अदयाप पोवेतो मृतदेह मिळुन न आल्याचे पोलीस अधिक्षक बस्ती यांनी सांगितले. सदर आरोपीत हा वालीव पोलीस ठाणे याचे ताब्यात असुन वालीव पोलीस उत्तरप्रदेश याचे संपर्कात असुन सदर आरोपीतास उत्तरप्रदेश पोलीस याचे ताब्यात देण्याची कार्यवाही चालु आहे.

वरील कामगीरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाठ सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, श्री.कैलास बर्वे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे, श्री.राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/किरण म्हात्रे, संदीप पैठणे, पो.ना/सचिन दोरकर,सतिष गांगुर्डे, सुनिल चव्हाण, पो.शि/राजेंद्र काकडे, जयवंत खंडवी, सचिन खताळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

------------ooo-----------